# वसई-विरार शहर महानगरपालिका
## वैद्यकीय आरोग्य विभाग

दि.०३/०७/२०२५

# प्रेसनोट

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत शहरातील नागरिकांना आवश्यक वैद्यकीय सेवा देण्यात येतात. सदरचे सेवेकरीता औषधे व तद्अनुषंगिक वस्तु महाराष्ट्र शासनच्या मार्गदर्शक सुचनेनुसार ई-निविदेमार्फत उपलब्ध करुन घेण्यात येतात. राज्यातील काही शासकीय व निमशासकीय रुग्णालयांना पुरविण्यात आलेले औषधे हे बनावट असल्याचे आढळुन आले आहे. त्यानुषंगाने करण्यात आलेल्या तपासण्या अंती असे निर्दशनास आले की, Tab.Cefixime IP २००mg या औषधाचा पुरवठा मे.प्रनिक इटरप्रायझेस यांचेमार्फत महानगरपालिकेस करण्यात आला होता. सदरचा गुणवत्ता तपासणी अहवाल नापास आल्याने मे.प्रनिक इटरप्रायझेस व इतर ६ जणांवर औषध निरिक्षक, पालघर यांचेमार्फत गुन्हयाची नोंद करण्यात आली आहे.

Tab.Cefixime IP २००mg या औषधाच्या पुरवठा वेळी पुरवठादार/ M/s.Mellwon Biosciences, Theissur Kerla यांचेमार्फत गुणवत्ता तपासणी अहवाल व जीएमपी (गुड्स मॅनीफॅक्चरींग प्रॅक्टिस) प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यात आले होते. त्याअर्थी सदरचे औषध सुरक्षित व वापरण्यास योग्य असल्याचा बोध होत असल्याने महानगरपालिकेमार्फत वापरण्यात आले. तथापि औषध निरिक्षक, पालघर यांनी दाखल केलेल्या गुन्हा स्वरुप मे.प्रनिक इंटरप्रायझेस, नालासोपारा (प.) यांना काळया यादीत टाकण्यात आले असून त्यांचेमार्फत होणारा पुरवठा पूर्णपणे स्थगित करण्यात आला आहे. सोबतच इतर पुरवठादारांच्या औषधांचे नमुने अन्न व औषध प्रशासनामार्फत तपासण्याचे प्रमाण वाढविण्यात येत आहे. तसचे यापुढे वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत आक्रमकपणे औषधांची तपासणी वाढविण्यात आली असून जेणेकरुन भविष्यात अशा प्रकारची औषधांवर वेळीच आळा घालणे शक्य होईल.

वसई विरार शहर महानगरपालिकेतील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, वैद्यकीय आरोग्य विभागातंर्गत कार्यरत रुग्णालये/ माता बाल संगोपन केंद्रे/ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे/ आयुष्मान आरोग्य मंदिर/ आपला दवाखाना येथे मिळणारी औषधे सुरक्षित असुन यापासून जिवितास कोणत्याही प्रकारचे नुकसान नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**वैद्यकीय आरोग्य विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**